# शिव

## (शास्त्रीय विवेचन आणि उपासना)

(Marathi)

**संकलक**

परात्पर गुरु डॉ. जयंत बाळाजी आठवले

पू. संदीप गजानन आळशी

**सनातन संस्था**

**हा लघुग्रंथ स्वतः वाचा अन् इतरांनाही वाचण्यासाठी द्या !**

**प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या १०,००० प्रती**

**आणि आतापर्यंत १,५५,५०० प्रती प्रकाशित !**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 卐 | शिवाविषयीच्या विवेचनाचे महत्त्व | ६ |
| 卐 | मनोगत | ७ |
| १. | व्युत्पत्ती आणि अर्थ | ८ |
| २. | काही इतर नावे | ८ |
| ३. | वैशिष्ट्ये | १० |
| ४. | कार्य | १८ |
| ५. | शिवाची रूपे | २० |
| ६. | मूर्तीविज्ञान | २५ |
| ७. | सनातन-निर्मित शिवाचे सात्त्विक 'चित्र' आणि 'नामजप-पट्टी' | २७ |
| ८. | शिवाची प्रसिद्ध स्थाने | ३२ |
| ९. | उपासना | ३५ |

# शिवाविषयीच्या विवेचनाचे महत्त्व

आध्यात्मिक उन्नतीसाठी ‘पिंडी ते ब्रह्मांडी’ असा प्रवास करायचा असतो. त्याचा अर्थ असा की ‘ब्रह्मांडात’, म्हणजे शिवात, जी तत्त्वे आहेत ती ‘पिंडात’, म्हणजे जिवात, यायला हवीत. तरच तो जीव शिवाशी एकरूप होऊ शकतो. पाण्याच्या थेंबात तेलाचा थोडासाही अंश असल्यास तो पाण्याशी एकरूप होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे शिवभक्तात शिवाची सर्व वैशिष्ट्ये असल्याविना तो शिवाशी एकरूप होऊ शकणार नाही; म्हणजेच त्याला सायुज्य मुक्ती मिळणार नाही. यासंदर्भात या लघुग्रंथात दिलेली शिवाची वैशिष्ट्ये साधकांना मार्गदर्शक वाटतील. विष्णु, राम, कृष्ण, मारुति, दत्त, शक्ति, गणपति, विठ्ठल, महालक्ष्मीदेवी व सरस्वतीदेवी यांच्याविषयी विशिष्ट ज्ञान देणारे लघुग्रंथही उपलब्ध आहेत.

# मनोगत

बहुतेकांना देवाविषयी जे थोडेफार ज्ञान असते, ते बहुधा त्यांनी लहानपणी वाचलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टींमुळे असते. अशा अल्प ज्ञानामुळे त्यांचा देवावरचा विश्वासही थोडाफारच असतो. देवतांविषयी जास्त ज्ञान मिळाल्यास जास्त विश्वास निर्माण होण्यास सहाय्य होते. विश्वासाचे रूपांतर पुढे श्रद्धेत झाल्याने देवतेची उपासना अन् साधनाही चांगल्या प्रकारे होते. तसे व्हावे म्हणून या लघुग्रंथात शिवाविषयी इतरत्र बहुधा न दिलेले पण उपयुक्त असे अध्यात्मशास्त्रीय विवेचन करण्यावर विशेष भर दिला आहे. शिवाविषयी सविस्तर विवेचन 'शिव' या ग्रंथात केले आहे.

हा लघुग्रंथ वाचून प्रत्येकाला साधनेची स्फूर्ती मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**